**आरबीआय/२०१३-१४/१००**
**डीजीबीए.जीएडीक्र.एच २/३१.१२.०१०/२०१३-१४** जुलै १, २०१३

सर्व एजन्सी बँका

महोदय/महोदया,

**एजन्सी बँकांद्वारे सरकारी व्यवहार करण्यावरील महापरिपत्रक - एजन्सी कमिशनचे प्रदान**

वरील विषयावरील आमचे महापरिपत्रक आरबीआय/२०१२-१३/१०२ दि, जुलै २, २०१२ चा संदर्भ घ्यावा. जून २०१३ च्या अखेरीपर्यंत आम्ही दिलेल्या महत्वाच्या सूचना समाविष्ट करुन हे महापरिपत्रक अद्यावत करण्यात आले आहे. ह्याची एक प्रत तुमच्या माहितीसाठी सोबत जोडली आहे. हे महापरिपत्रक आमच्या www.mastercirculars.rbi.org.in ह्या वेबसाईटवरुनही डाऊनलोड करता येईल.

२. कृपया पोच द्यावी.

आपला
(बी.के.मिश्रा)
मुख्य महाव्यवस्थापक

सोबत - वरीलप्रमाणे

हा विभाग आयएसओ ९००१:२००० प्रमाणित आहे
सरकारी आणि बँक लेखा विभाग, केंद्रीय कार्यालय, मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, भायखळा मुंबई-४०००००८,
टेलिफॉन : (०२२) २३०८ ४१२१, फॅक्स क्र. (०२२) २३०० ०३७०/२३०१ ६०७२/२३०१ ००९५, ईमेल : cgmicdgbaco@rbi.org.in

सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.

# एजन्सी कमिशन वरील महापरिपत्रक

**१. सरकारी व्यवहारांवर देय असलेली एजन्सी कमिशन्स**
**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच.७५७५/३१.१२.०११/२०११ १२ दि. मे २२, २०१२]**
**[डीजीबीए.जीएडी एच.२५२९/३१.१२.०१०/(सी)/२०१२-१३ दि. ऑक्टोबर ३१, २०१२]**

भारतीय रिझर्व बँक, तिच्या स्वतःच्या आणि आरबीआय अधिनियम, १९३४ च्या कलम ४५ खाली नेमलेल्या एजन्सी बँकांच्या कार्यालयांद्वारे, उभयपक्षी केलेल्या करारानुसार, केंद्र व राज्य सरकारांचा बँकिंग व्यवसाय करते. एजन्सी बँकांनी केलेल्या सरकारी व्यवहारांसाठी, रिझर्व बँक, त्यांना एजन्सी कमिशन (ह्याला टर्न ओव्हर कमिशन असेही म्हणतात) देते. एजन्सी बँक करारनाम्याच्या परिच्छेद ५ अन्वये, आरबीआय, तिने ठरविलेल्या दराने एजन्सी कमिशन देते. ह्याबाबत एक आढावा घेण्यात आला असून खाली दिल्यानुसार सुधारित एजन्सी कमिशन देण्याचे ठरविण्यात आले आहे

| अनुक्रमांक | व्यवहाराचा प्रकार | एकक | सुधारित दर रुपयां मध्ये |
|---|---|---|---|
| १. (१) | रिसीट्स प्रत्यक्ष रितीने | प्रति व्यवहार | ५०/- |
| (२) | रिसीट्स - ई - मोड | प्रति व्यवहार | १२/- |
| २. | पेन्शन प्रदान | प्रति व्यवहार | ६५/- |
| ३. | पेन्शन सोडून अन्य प्रदाने | प्रति रु. १००/- उलाढाल | ५.५ पैसे. |

२. ह्या संदर्भात, वरील कोष्टकात क्रमांक १(२) मध्ये दर्शविलेल्या रिसीट्स ई-मोड-व्यवहार ह्यासाठीचा संदर्भ, इंटरनेट बँकिंग मार्फत केलेल्या, प्रेषणकर्त्याच्या बँक खात्यातून निधी प्रेषणाचे व्यवहार तसेच प्रत्यक्ष रोख रक्कम/संलेख देण्याचा संबंध नसलेले व्यवहार ह्यांच्याशीही आहे.
३. हे सुधारित दर **जुलै १, २०१२** पासून जारी करण्यात आले आहेत.

४. एजन्सी बँकांनी, त्यांचे एजन्सी कमिशनबाबतचे हक्क/दावे विहित केलेल्या नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. सर्व एजन्सी बँकांनी एजन्सी कमिशन मागण्याबाबतचे सुधारित नमुने आणि बँकेचे अधिकारी व चार्टर्ड अकाऊंटंट्स त्यांनी सह्या करुन द्यावयाची वेगळी प्रमाणपत्रे जोडपत्र ब मध्ये दिली आहेत. (सरकारी व्यवहार पाहणा-या) ईडी/सीजीएमद्वारा दिल्या जाणा-या नेहमीच्या प्रमाणपत्रांव्यतिरिक्त ही असतील व त्यात, पेन्शनची कोणतीही थकबाकी क्रेडिट करावयाची राहिली नाही/नियमितपणे पेन्शन किंवा थकबाकी क्रेडिट करण्यास विलंब झालेला नाही असा मजकूर असावा.

**२. एजन्सी कमिशन - सार्वजनिक भविष्यनिधी योजना, १९९८(पीपीएफ) व वरिष्ठ नागरिक बचत योजना, २००४(एससीएसएस)**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच.७५७५/३१.१२.०११/२०११-१२ दि. मे २२, २०१२] सह वाचित,**
**[डीजीबीए.जीएडी.एच.१४०२४/३१.१२.०१०/२००६-०७ दि. मार्च १६, २००७]**

पीपीएफ व एससीएसएस हाताळण्याबाबत रिझर्व बँकेने द्यावयाच्या एजन्सी कमिशनच्या प्रश्नावर भारत सरकारचा सल्ला घेऊन परीक्षण केले गेले आणि पीपीएफ व एससीएसएसखाली व्यवहार हाताळण्यासाठी बँकांना द्यावयाच्या मानधनासाठी

केवळ एकाच वाहिनीचा उपयोग करण्याचे ठरविण्यात आले त्यानुसार, जुलै १, २०१२ पासून, पीपीएफ व एससीएसएस संबंधीच्या व्यवहारांवर भारतीय रिझर्व बँक पुढील दराने एजन्सी कमिशन देईल.

(अ) रिसीट्स (१) प्रत्यक्ष रितीने - रु.५०/- प्रति व्यवहार (२) ई-मोड - रु.१२/- प्रति व्यवहार

(ब) प्रदाने ५.५ पैसे प्रति रु.१००/- ची उलाढाल

पीपीएफ व एससीएसएस हाताळण्यासाठी असलेला मोबदला देणे भारत सरकार बंद करील.

**३. एजन्सी कमिशनसाठी पात्र असलेले सरकारी व्यवहार**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-२६२५-२६५८/ ३१.१२.०१०(सी)/२००४-०५) दि डिसेंबर १७, २००४]**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-८८५२ /३१.१२.०१०(सी)/२०११-१२ दि जून २१, २०११]**

एजन्सी बँकांनी केलेले पुढील व्यवहार एजन्सी कमिशनसाठी पात्र असतील :

- केंद्र/राज्य सरकारांच्या वतीने केलेल्या रेव्हेन्यु रिसीट्स व प्रदाने.
- केंद्र सरकार व राज्य सरकारांच्या बाबतीत केलेली पेन्शन प्रदाने
- विशेष ठेव योजना, १९७५ (एसडीएस) व सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधी (पीपीएफ) योजना
- वरिष्ठ नागरिक बचत योजना (एससीएसएस)
- एजन्सी कमिशनसाठी पात्र असलेली, रिझर्व बँकेनेविशेषत्वाने सांगितलेली कोणतीही योजना (उदा. रिलीफ बाँड्स/सेव्हिंग्ज बाँड्स इत्यादिंचे व्यवहार)

वित्तीय संस्था व बँका ह्यांच्याकडून थेट केलेली लघु मुदत/दीर्घ मुदतीची कर्जे, एजन्सी कमिशनसाठी पात्र नाहीत कारण, हे व्यवहार सर्वसाधारण बँक व्यवहारांच्या स्वरुपाचे समजले जात नाहीत. सार्वजनिक कर्ज हाताळण्यासाठी/व्यवस्थापनासाठी, रिझर्व बँक, एजन्सी बँकांना, एजंट म्हणून काम करण्यास, ठरविल्याप्रमाणे वेगळा मोबदला देत असते. येथे पुनश्च सांगण्यात येते की, मंत्रालये/विभाग इत्यादींच्या वतीने उघडलेल्या पतपत्रांच्या (एलसी) बाबतीत निर्माण झालेले व्यवहार एजन्सी कमिशनसाठी पात्र नसतील.

तथापि काही एजन्सी बँकांनी दिलेल्या संदर्भांचा विचार करता, बँकांनी मुद्रांक शुल्क गोळा करण्याबाबत एजन्सी कमिशन देण्याबाबतचा प्रश्न आमच्याकडून तपासला गेला असून, बँकांद्वारे मुद्रांक शुल्क गोळा केले जाण्याबाबतचे सरकारी व्यवहार, पुढीलप्रमाणे एजन्सी कमिशनसाठी पात्र ठरतील :

१) जेथे एजन्सी बँका प्रत्यक्षपणे किंवा इलेक्ट्रोनिक पध्दतीने(चलान पध्दती) मुद्रांक शुल्क गोळा करतात तेथे एजन्सी कमिशन देणे लागु होईल. मात्र तेव्हा बँकांनी जनतेकडून त्यासाठी कोणताही आकार घेतलेला नसावा किंवा हे काम करण्यासाठी राज्य सरकारकडून मोबदला घेतलेला नसावा.

२) फ्रँकिंग करण्याबाबत, राज्य सरकारद्वारे त्या एजन्सी बँकेला फ्रँकिंग व्हेंडर म्हणून नेमलेले असते आणि ती बँक कागदपत्रांचे फ्रँकिंग करण्यासाठी जनतेकडून मुद्रांक शुल्क गोळा करत असते. राज्य सरकार त्या बँकेला एक फ्रँकिंग व्हेंडर म्हणून कमिशन देत असल्याकारणाने ती बँक एजन्सी कमिशनसाठी पात्र ठरत नाही. तथापि, फ्रँकिंग बारच्या खरेदीसाठी, चलानद्वारे प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक पध्दतीने ट्रेझरीमध्ये जमा करण्यासाठी, फ्रँकिंग व्हेंडरने दिलेले मुद्रांक शुल्क गोळा करणारी एजन्सी बँक एजन्सी कमिशन मिळविण्यासाठी पात्र असेल - कारण, वरील बाब (१) मध्ये दिल्याप्रमाणे ते मुद्रांक शुल्काचे करावयाचे नियमित प्रदान असेल.

सर्व एजन्सी बँकांनी, टर्नओव्हर कमिशनची (टीओसी) मागणी करतेवेळी, अपात्र असलेल्या व्यवहारांवर टीओसी मागण्यात आलेले नाही असे प्रमाणपत्र द्यावे.

**४. एजन्सी बँकांद्वारे, आयकर/इतर थेट कर आणि राज्य सरकारचा व्यवसाय कर/इतर कर स्विकरण्याची योजना**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच--४१/४२.०२.००१/२००३-०४ दि जुलै २२, २००४]**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच--१२२५-१२५८/४२.०२.००१/२००४-०५) दि ऑक्टोंबर २७, २००४]**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच--३५६८-३६०१/४२.०१.००१/२००४-०५) दि जानेवारी १३, २००५]**

अशा एजन्सी बँका की ज्यांची स्वतःची प्राधिकृत थेट कर गोळा करण्यासाठी शाखा नाही व ज्या त्यांच्या कराबाबतच्या जबाबदाऱ्यांचे प्रदान त्यांच्या स्वतःच्या शाखांद्वारे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या प्राधिकृत शाखा किंवा भारतीय रिझर्व बँकेच्या कार्यालयांद्वारे करतात त्यांनी त्याबाबत स्क्रोलमध्ये तसे वेगळे निर्देशित करावे. असे व्यवहार एजन्सी कमिशनसाठी पात्र असणार नाहीत. बँकांनी प्रमाणपत्र सादर करावे की, त्यांने स्वतःचे कर (टीडीएस, कॉर्पोरेशन टॅक्स इत्यादि) एजन्सी कमिशन मागतेवेळी वगळलेले आहेत.

**५. एजन्सी कमिशनमधून टीडीएस कापला जाणे**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१९०/३१.१२.०१०/२००३-०४ दि सप्टेंबर १४, २००३]**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-६६७०/३१.१२.०१०(सी)/२०१०-११ दि मार्च २४, २०११]**

सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसद्वारा ठरविण्यात आले आहे की त्यांना दिलेल्या एजन्सी कमिशनमधून किंवा त्यांनी त्यांच्या एजंटांना दिलेल्या कमिशनमधून कर कापण्याची आवश्यकता नाही. सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस ह्यांनी त्यांचे ऑफिस मेमोरँडम एफ.क्र. २७५/२०/२०११-आयटी (बी) दि. १४ मार्च २०११ अन्वये स्पष्ट केले आहे की 'केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या सर्वसाधारण बँकिंग व्यवसायासाठी केलेल्या व्यवहारांबाबत, एजन्सी बँकांना दिलेल्या किंवा त्यांनी त्यांच्या एजंटांना दिलेल्या टर्नओव्हर कमिशनवर कर कापला जाणार नाही', तथापि येथे पुनश्च सांगण्यात येते की, संबंधित बँकांच्या हातामधील एजन्सी कमिशन हे करपात्र असेल कारण ते बँकेच्या उत्पन्नाच्या एक भाग असेल.

**६. एजन्सी बँकांद्वारे सादर केलेल्या एजन्सी कमिशनच्या मागण्या - सर्वसामान्य अनियमितता - चुकीच्या मागण्यांसाठी दंडात्मक व्याज आकारणी**

**[आरबीआय/२००५/१९३(संदर्भःडीजीबीए.जीएडी.क्र.एच-४५३०/३१.१२.०१०(सी)/२००५-०६) दि ऑक्टोंबर २७, २००५]**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-११९३६/३१.१२.०१०(सी)/ २००५-०६दि जानेवारी ३१, २००६]**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१३११८/३१.१२.०१० (सी)/ २००५-०६ दि मार्च २, २००६]**

काही एजन्सी बँकांनी सादर केलेल्या एजन्सी कमिशन मागण्यांची वरवर छाननी केली असताना आढळलेल्या सर्वसामान्य अनियमितांबाबत एजन्सी बँकांना कळविण्यात आले होते. एजन्सी कमिशनची मागणी करतेवेळी योग्य ती काळजी घेणे तसेच त्या बरोबर आहेत ह्याची बँकांनी खात्री करुन घेणे आवश्यक आहे चुकीच्या मागण्या टाळण्यासाठी, दिलेली माहिती त्यांनी त्यांच्या अंतर्गत/कॉंकरंट ऑडिटरकडून प्रमाणित करुन घ्यावी. तडजोड झालेल्या चुकीच्या एजन्सी कमिशनसाठी एजन्सी बँकांना दंडात्मक व्याज बँक-दराने अधिक २% द्यावे लागेल.

**७. विशेष ठेव-योजनांवरील एजन्सी कमिशन**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-११७९४/३१.१२.०१० (सी)/ २००५-०६ दि फेब्रुवारी १३, २००६]**
**बरोबर वाचा**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-७५७५/३१.१२.०११ / २०११-१२ दि मे २२, २०१२]**

एसडीएस-१९७५ खाली असलेले व्यवहार, पेन्शन सोडून अन्य व्यवहार अनुसार धरले जाऊन त्यानुसार कमिशनसाठी पात्र असतील. त्यामुळे, जुलै १, २०१२ पासून अशा व्यवहारांवर, प्रति रु.१०० च्या उलाढालीवर ५.५ पैसे कमिशन मिळविण्यास एजन्सी बँका पात्र आहेत. ह्या योजनेखाली नवीन ठेवींसाठी परवानगी नसल्याने, एसडीएस-१९७५ बाबत विद्यमान व्यवहार पुढीलप्रमाणे असतील.

अ) ह्या फंडाकडून ह्याबाबत विनंती आल्यास निकासी करण्यास परवानगी देणे
ब) वार्षिक दराने व्याजप्रदान करणे आणि
क) योजनेमध्ये खाते बंद केले जाणे.

**८. पेन्शन - व्यवहारांवर एजन्सी कमिशन**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच.१३०३४/३१.१२.०१०(सी)/ २००६-०७ दि फेब्रुवारी २७, २००७]**

**या बरोबर वाचा**

**[डीजीबीए.जीएडी.क्र. ७५७५/३१.१२.०११/२०११-१२ दि मे २२, २०१२]**

जुलै १, २०१२ पासून, एजन्सी बँका, पेन्शनची आकडेमोड करुन पेन्शन वाटपाचे संपूर्ण काम करत असल्यासच, पेन्शन व्यवहारांसाठी, प्रति व्यवहार रु.६५/- ह्या दराने एजन्सी कमिशन मिळविण्यास एजन्सी बँका पात्र असतील. परंतु, पेन्शनची आकडेमोड करण्याचे काम संबंधित सरकारी विभाग/ट्रेझरीद्वारा केले जात असून, बँक शाखांमध्ये त्या सरकारी खात्यांनी ठेवलेल्या खात्यातून डेबिट करुनच पेन्शनरांच्या खात्यात पेन्शन क्रेडिट करण्याचे कामच बँक शाखा करीत असल्यास असा व्यवहार पेन्शन प्रदान सोडून अन्य वर्गीकृत केला जाईल व त्यावर जुलै १, २०१२ पासून प्रति रु.१००/- च्या उलाढालीवर ५.५ पैसे एजन्सी कमिशन मिळण्यास पात्र असेल.

**९ एजन्सी कमिशनच्या मागणीत अवास्तव वाढ**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच.१८००/३१.१२.०१०(सी)/ २००९-१० दि ऑगस्ट २१, २००९]**

भारतीय रिझर्व बँकेची प्रादेशिक कार्यालये/केंद्रीय लेखा विभाग नागपुर येथे विहित नमुन्यात पाठविलेल्या एजन्सी कमिशनच्या मागण्या बरोबर आहेत ह्याची खात्री एजन्सी बँकांनी करुन देणे आवश्यक आहे. ह्याशिवाय, चुकीच्या मागण्या टाळण्यासाठी, बँकशाखांनी त्यांच्या मागणी - अर्जात दिलेली माहिती त्यांच्या अंतर्गत/कॉंकरंट ऑडिटर्सनी प्रमाणित केलेली असावी. तथापि, आमच्या प्रादेशिक कार्यालयांद्वारा कळविण्यात आले आहे की काही एजन्सी बँकांनी, त्यांच्या अंतर्गत/कॉंकरंट ऑडिटर्सनी प्रमाणित केलेल्या मोठ्या रकमांच्या चुकीच्या मागण्या सादर केल्या आहेत. अशा चुकीच्या मागण्या अंतर्गत/ कॉंकरंट ऑडिटर्सद्वारा प्रमाणित केल्या गेल्यास त्रैमासिक मागण्या करण्यातील आवश्यक अटीच्या गरजेचा हेतूच नष्ट होईल. ह्याचा विचार करता, संबंधित शाखांनी आमच्या प्रादेशिक कार्यालयाकडे पाठविलेल्या एजन्सी कमिशनच्या मागण्या बरोबर असल्याची खात्री करुन घेण्यासाठी एजन्सी बँकांना विनंती करण्यात येत आहे. या संदर्भात, एजन्सी बँकांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी त्या त्या शाखांना आमच्या कडे पाठविलेले कमिशन क्लेम्स बरोबर आहेत ह्या विषयी सतर्क करावे.

**१०. बाह्य ऑडिटरद्वारे प्रमाणित करावयाच्या एजन्सी कमिशनच्या मागण्या**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच.३९०३/३१.१२.०१०(सी)/२००९-१० दि नोव्हेंबर ११, २००९]**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच.१६०/३१.१२.०१०(सी)/२०१०-११ दि जुले ७, २०१०]**

ह्या सूचना व्यतिरिक्तही, आमच्या प्रादेशिक कार्यालयांकडे अजूनही एजन्सी बँकांकडून चुकीचे/अतिरिक्त दावे येतच आहेत. ह्यासाठी ठरविण्यात आले आहे की, यानंतर एजन्सी बँकांनी एजन्सी कमिशनसाठी सादर केलेले दावे बाह्य ऑडिटरद्वारा (चार्टर्ड अकाऊंटंट्स) ऑडिट व प्रमाणित करुन नंतरच रिझर्व बॅंकेकडे सादर केले जावेत. जेथे असा बाह्य ऑडिटर हा

कॉकरंट ऑडिटर/वैधानिक ऑडिटर आहे तेथे असे दावे त्या कॉकरंट ऑडिटर/वैधानिक ऑडिटरद्वारा प्रमाणित केले जाऊ शकतात. त्यानुसार एजन्सी बँकांना सांगण्यात आले होते की, आमच्या प्रादेशिक कार्यालयाकडे सादर केलेले एजन्सी कमिशनबाबतचे सर्व दावे एखाद्या बाह्य ऑडिटरकडून (चार्टर्ड अकाऊंटंट) प्रमाणित करुनच पाठविले जावेत. आमच्या प्रादेशिक कार्यालयाकडे पाठविलेल्या एजन्सी कमिशनच्या दाव्यांसोबत, ते दावे, एका बाह्य ऑडिटरद्वारे (चार्टर्ड अकाऊंटंट) ऑडिट करण्यात आले असून ते योग्य असल्याचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. बाह्य ऑडिटरने दिलेल्या प्रमाणपत्रात इतर बाबींबरोबर पुढील विधाने असावीत :

(अ) रिसीट व पेन्शन प्रदान व्यवहार तसेच पेन्शन प्रदान सोडून अन्य प्रदाने ह्या बाबतच्या एजन्सी कमिशन दावे (कमिशन क्लेम अर्जात निर्देशित केलेले व आरबीआयकडे सादर केलेले) त्या एजन्सी बॅंकेच्या त्या-त्या शाखांमध्ये ठेवलेल्या रेकॉर्डबरोबर पडताळून पाहण्यात आले आहेत आणि

(ब) आकारमानावर आधारित (संख्या) व्यवहारांबाबत, (उदा. रिसीट आणि पेन्शन प्रदान व्यवहार) एजन्सी कमिशनचे दावे फक्त एकदाच करण्यात आले आहेत आणि पेन्शन प्रदाने सोडून अन्य प्रदाने बाबत असलेल्या मूल्य-आधारित व्यवहार काढतांना ते वगळण्यात आले आहेत.

ह्या व्यतिरिक्त, एजन्सी बँकांनी खात्री करुन घ्यावी की, त्यांच्या शाखांनी एजन्सी कमिशन बाबत सादर केलेल्या दाव्यांची तपासणी अंतर्गत निरिक्षक/ऑडिटर्सद्वारा केली गेली असून नियमित निरीक्षण/ऑडिट दरम्यान त्यांची सत्यता पडताळून पाहण्यात आली आहे.

-----------

**जोडपत्र अ**

**ह्या महापरिपत्रकात समाविष्ट केलेल्या परिपत्रकांची यादी**

| अनु. क्र. | परिपत्रक क्रमांक | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | डीजी बीए.जीएडी.क्र.एच-१९०/ ३१.१२.०१० /२००३-०४ | सप्टेंबर १४, २००३ | आरबीआयद्वारे एजन्सी कमिशनवर टीडीएस लावला जाणार नाही. |
| २. | डीजीबीए.जीएडी.क्र.एच ४१/४२.०२.००१/२००३-०४) | जुलै २२, २००४ | एजन्सी बँकांद्वारे आयकर व इतर कर (केंद्र सरकार) आणि राज्य सरकारांचे व्यवसाय कर/इतर कर स्वीकारण्याची योजना |
| ३. | डीजीबीए.जीएडी.क्र. एच-१२२५-१२५८/४२.०२.००१ /२००४-०५) | ऑक्टोबर २७, २००४ | एजन्सी बँकांद्वारे आयकर व इतर कर (केंद्र सरकार) आणि राज्य सरकारांचे व्यवसाय कर/इतर कर स्वीकारण्याची योजना |
| ४. | डीजीबीए.जीएडी. क्र. एच-२६२५-२६५८ /३१.१२.०१० (सी) /२००४-०५) | डिसेंबर १७, २००४ | एजन्सी बँकांद्वारे सरकारी व्यवसाय चालविण्याबाबत मोबदला - टर्नओव्हर कमिशन देणे |
| ५. | आरबीआय/२००४-०५/३४४ (संदर्भः डीजीबीए.जीएडी. क्र. एच-३५६८ - ३६०१/ ४२.०१.००१/ २००४-०५) | जानेवारी १३, २००५ | एजन्सी बँकांद्वारे आयकर व इतर कर (केंद्र सरकार) आणि राज्य सरकारांचे व्यवसाय कर/इतर कर स्वीकारण्याची योजना |
| ६. | डीजीबीए.जीएडी.एच.१३०३४/३१.१२.०१०(सी)/२००६-०७<br>डीजीबीए.जीएडी.क्र.७५७५/३१.१२.०११/२०११-१२ | फेब्रुवारी २७, २००७<br>मे २२, २०१२ | पेन्शन व्यवहारांवरील कमिशन |
| ७. | डीजीबीए.जीएडी. क्र. एच ४५३० /३१.१२.०१० (सी)/२००५-०६)<br>डीजीबीए.जीएडी. क्र. एच- १११३६/ ३१.१२.०१० (सी) /२००५-०६ आणि<br>डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१३११८/ ३१.१२.०१० (सी) /२००५-०६ | ऑक्टोबर २७, २००५<br>जानेवारी ३१, २००६<br>मार्च २, २००६ | एजन्सी बँकांद्वारे सादर केलेले दावे - सर्वसामान्य अनियमितता |
| ८. | डीजीबीए.जीएडी. क्र. एच- ११७९४/ ३१.१२.०१० (सी)/२००५-०६ | फेब्रुवारी १३, २००६ | विशेष ठेव योजनेवर एजन्सी कमिशन |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | डीजीबीए. जीएडी.क्र. एच-१४०२४/ ३१.१२.०१०/ २००६-०७) | मार्च १६, २००७ | सार्वजनिक भविष्यनिधी योजना, १९६८ (पीपीएफ) आणि वरिष्ठ नागरिक बचत योजना, २००४ (एससीएसएस) ह्यावर एजन्सी कमिशन |
| १०. | डीजीबीए.जीएडी.एच-१८००/३१.१२.०१० (सी)/ २००९-१० | ऑगस्ट २१, २००९ | एजन्सी कमिशन दाव्यांमध्ये अवास्तव वाढ |
| ११. | डीजीबीए.जीएडी.एच-३९०३/ ३१.१२.०१०(सी)/२००९-१० | नोव्हें बर ११, २००९ | बाह्य ऑडिटर/चार्टर्ड अकाउंटंटद्वारा एजन्सी कमिशनच्या मागण्या प्रमाणित केल्या जाणे. |
| १२. | डीजीबीए.जीएडी.क्र.एच.१६०/३१.१२.०१०(सी)/२०१०-११ | जुलै ७, २०१० | बाह्य ऑडिटर/चार्टर्ड अकाउंटंटद्वारा एजन्सी कमिशनच्या मागण्या प्रमाणित केल्या जाणे. |
| १३. | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-६६७०/३१.१२.०१०(सी)/२०१०-११ | मार्च २४, २०११ | आरबीआयद्वारे एजन्सी कमिशनवर टीडीएस लावला जाणार नाही. |
| १४. | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-८८५२/३१.१२.०१०(सी)/२०१०-११ | जुन २१ , २०११ | पंजीकरण शुल्क व मुद्रांक शुल्कावर एजन्सी कमिशन देणे |
| १५. | डीजीबीए.जीएडी.क्र.एच.२५२९/३१.१२.०१०(सी)/२०१२-१३ | ऑक्टोबर ३१, २०१२ | एजन्सी बँकांद्वारे एजन्सी कमिशन मागणीसाठी नवा नमुना कार्यकारी गटाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी |

**जोडपत्र - ब**

**परिपत्रक क्र. डीजीबीए.जीएडी.क्र.एच २५२९/३१.१२.०१० (सी)/२०१२-१३, दि. ऑक्टोबर ३१, २०१२ चे जोडपत्र**

**----------------------------------------- रोजी संपलेल्या तिमाहीसाठीच्या एजन्सी कमिशनची मागणी**

**विभाग १ बँकेचा तपशील**

**बँकेचे नाव :**

**हक्क सांगणा-या कार्यालयाचा पत्ता :**

**कोणासाठी अधिकृत (सरकारी विभागाचे नाव) :**

**करत असलेल्या कार्यकृती :**

| **विभाग २ - हक्कांचा तपशील तपशील** | | | | |
|---|---|---|---|---|
| | **व्यवहारांची संख्या** | | **रक्कम रुपयांमध्ये** | |
| | **प्रत्यक्ष** | **इलेक्ट्रॉनिक** | **प्रत्यक्ष** | **इलेक्ट्रॉनिक** |
| **(१) एकूण रिसीट्स** | | | | |
| **(२) वजा** | | | | |
| (अ) बँकेच्या स्वतःच्या करविषयक जबाबदा-यांबाबतच्या रिसीट्स ** | | | | |
| (ब) आयटी अधिनियमाखाली इतर निरनिराळ्या बाबींवरील टीडीएस. | | | | |
| (क) वरिष्ठ नागरिक बचत योजना, २००४ (एससीएसएस २००१) सोडून, केंद्र/राज्य सरकारने वरिष्ठ नागरिकांसाठी केलेल्या योजना/विशेष योजना खालील व्यवहार | | | | |
| (ड) एरर स्क्रोल व्यवहार | | | | |
| (ई) इतर अपात्र व्यवहार (जसे, वित्तसंस्था/बँककडून राज्य सरकारांनी घेतलेल्या दीर्घ मुदतीच्या कर्जांची परतफेड म्हणून मिळालेल्या रकमा, मंत्रालये/विभाग ह्यांच्या वतीने असलेले पतपत्र (एलसी), पेन्शनखालील जमा) (बाबवार तपशील द्यावा). | | | | |
| **(१. अ) निव्वळ रिसिट्स** | | | | |
| **(२) पेन्शन सोडून अन्य प्रदान** | | | | |
| **वजा** | | | | |
| (अ)वरिष्ठ नागरिक बचत योजना २००४ (एससीएसएस २००४) सोडून, केंद्र/राज्य सरकारने, ज्येष्ठ नागरिकांसाठी तयार केलेल्या योजना/विशेष योजनांसाठी केलेली प्रदाने. | | | | |
| (ब) एरर स्क्रोल व्यवहार | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (क) इतर अपात्र बाबी, (जसे एलसी व्यवहारांखालील प्रदाने) ((बाबवार तपशील द्यावा) | | | | |
| **(२ अ) - पेन्शन सोडून इतर निव्वळ प्रदाने** | | | | |
| **(३) एकूण पेन्शन प्रदाने** | | | | |
| **वजा** | | | | |
| अ)केंद्र/राज्य सरकारच्या कर्मचा-यांना सोडून इतर पेन्शन योजनांखाली प्रदाने | | | | |
| (ब) एरर स्क्रोल व्यवहार | | | | |
| **३ अ) निव्वळ पेन्शन प्रदाने** | | | | |
| **(४) एकूण (१ अ + २ अ + ३ अ).** | | | | |
| **(५)(१) पेन्शन खात्यांची संख्या तिमाहीच्या सुरुवातीस** | | | | |
| **(२) पेन्शन खात्यांची संख्या तिमाहीच्या अखेरीस** | | | | |
| | | | | |

**** स्वतःची प्राधिकृत अशी थेट कर गोळा करणारी शाखा नसलेल्या व भारतीय स्टेट बँकेच्या प्राधिकृत शाखांमार्फत किंवा रिझर्व बँकेच्या कार्यालयामार्फत किंवा स्वतःच्या शाखांमार्फत, स्वतःच्या कर जबाबदा-यांचे प्रदान करणा-या एजन्सी बँकांनी, त्याबाबत स्क्रोलमध्ये वेगळा निर्देश करावा आणि असे व्यवहार एजन्सी कमिशन मिळण्यास पात्र ठरणार नाहीत.**

**मागणी केलेली एजन्सी कमिशनची रक्कम -** **रुपये**

**प्रत्यक्ष रिसीट्स, प्रति व्यवहार रु. ५० दराने - उदा.** **------x------ =**

**ई रिसीट्स प्रति व्यवहार रु. १२ दराने - उदा.** **------x------ =**

**पेन्शन प्रदाने प्रति व्यवहार रु. ६५ दराने -** **------x------ =**

**पेन्शन सोडून अन्य प्रदाने रु. १०० च्या उलाढालीसाठी ५.५ पैसे दराने** **------x------ =**

**एकूण मागणी =**

(रुपये ...........................................)

प्राधिकृत अधिका-याचे नाव, हुद्दा व सही :

### *शाखा अधिका-याचे प्रमाणपत्र*

*प्रमाणित करण्यात येते की, एजन्सी कमिशन म्हणून दावा करण्यात आलेली रु. ----- ची रक्कम, रिसीट्स व पेन्शन पेमेंटच्या बाबत केलेल्या व्यवहारांची संख्या आणि केंद्र/राज्य सरकार/आरबीआय ह्यांच्या लेखा प्राधिकरणांना सादर केलेल्या दैनंदिन स्क्रोल्स मध्ये नोंदलेल्या पेन्शन प्रदाने व पेन्शन व्यतिरिक्त प्रदाने ह्याबाबतच्या व्यवहारांच्या रकमा हिशेबात घेता योग्य अशी देण्यात आली आहे. आणि ही रक्कम काढताना, आरबीआयच्या एजन्सी बँकांद्वारे सरकारी व्यवहार चालविला जाणे एजन्सी कमिशनचे प्रदान ह्या महापरिपत्रकात विहित केल्यानुसार पात्र असलेल्या बाबींचाच हिशेबात घेतलेल्या आहेत. आम्ही असेही प्रमाणित करतो की, एजन्सी कमिशन मागण्यात आलेल्या रिसीट्स व्यवहारांची संख्या, ह्या बँकेच्या स्वतःच्या करदायित्वाच्या व्यवहारांच्या आणि आयटी अधिनियमाखालील निरनिराळ्या बाबींखालील टॅक्स डिडक्टेड ॲट सोर्सच्या करांव्यतिरिक्त आहे.*

***बँकेच्या प्राधिकृत अधिका-याची सही, नाव व हुद्दा आणि बँकेचे सील.***

## चार्टर्ड अकाऊंटंटचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आम्ही ह्या शाखेने केलेल्या सरकारी व्यवहारांसंबंधीची रेकॉर्ड्स पडताळून पाहिली असून, एजन्सी कमिशन म्हणून मागण्यात येणारी रु. ------ ची रक्कम, *)रिसीट्स व पेन्शन पेमेंटच्या बाबत केलेल्या व्यवहारांची संख्या आणि केंद्र/राज्य सरकार/आरबीआय ह्यांच्या लेखा प्राधिकरणांना सादर केलेल्या दैनंदिन स्क्रोल्स मध्ये नोंदलेल्या पेन्शन प्रदाने व पेन्शन व्यतिरिक्त प्रदाने ह्याबाबतच्या व्यवहारांच्या रकमा हिशेबात घेता योग्य अशी देण्यात आली आहे* असेही प्रमाणित करण्यात येते की, वरील एजन्सी कमिशन, आरबीआयने दिलेल्या विद्यमान सूचनांनुसार केवळ पात्र असलेल्या व्यवहारांच्या आधारावरच काढलेली आहे आणि रिसीट्सचे व्यवहार, ह्या बँकेच्या कर-दायित्वासंबंधीच्या व्यवहारांव्यतिरिक्त आहेत.

**चार्टर्ड अकाऊंटंटची सही, नाव, पंजीकरण क्रमांक व पत्ता**